# जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर

शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. ईएसटी-२०१०/प्र.क्र.४२/ई-८, दिनांक ६ एप्रिल, २०११ व समक्रमांक दिनांक ३० जुलै, २०११ अन्वये शासनाने विधी अधिकारी गट - अ या पदाला सहाय्य करण्यासाठी रुपये ५२००-२०२०० (ग्रेडवेतन २४००) या वेतन श्रेणीतील प्रत्येक जिल्हयासाठी १ लघुटंकलेखकाचे अस्थायी पद भरण्याकरिता मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार या कार्यालयाच्या आस्थापनेवरील लघुटंकलेखक यांचे अस्थायी पद खुल्या प्रवर्गातून सरळसेवेने भरण्याकरिता दिनांक १६/१२/२०१३ रोजी पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत. लघुटंकलेखक यांचे एकाकी पद असल्यामुळे अनुशेष नाही.

**१. पदाचे नाव** : **लघुटंकलेखक**

**२. पदसंख्या** : **१ (एक)**

**३. वेतनश्रेणी** : रुपये ५२००-२०२०० (ग्रेडवेतन २४००)

**४. शैक्षणिक अर्हता**

१) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण (किमान एस.एस.सी उत्तीर्ण)

२) शासकिय वाणिज्य संस्थेचे मराठी व इंग्रजी लघुलेखनाचा वेग ८० श.प्र.मि. उत्तीर्ण (दोन्ही आवश्यक)

३) इंग्रजी टंकलेखन वेग ४० श.प्र.मि.व मराठी टंकलेखन वेग ३० श.प्र.मि. उत्तीर्ण

४) उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असेल.

५) संगणक अर्हता

**५. वयोमर्यादा** : उमेदवाराचे वय दि. १/१२/२०१३ रोजी किमान १८वर्षे व कमाल ३३ वर्षे.

**६.** अर्जासोबत शुल्क :- रु. ३८० परिक्षा शुल्क **जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती, मुंबई शहर** यांच्या नावाने डि.डि. (धनाकर्ष) काढून अर्जासोबत जोडावा.

**७.** अर्जदाराने अर्जासोबत खालील कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडणे बंधनकारक आहे. खालील कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती अर्जासोबत जोडल्या नाहीत तर, अर्जदार अपात्र ठरेल.

१. महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परिक्षा प्रमाणपत्र
२. शाळा सोडल्याचा दाखला / जन्म दाखला
३. शासकिय वाणिज्य संस्थेचे मराठी व इंग्रजी लघुलेखनाचा वेग ८० श.प्र.मि. दोन्ही आवश्यक
४. इंग्रजी टंकलेखन वेग ४० श.प्र.मि.व मराठी टंकलेखन वेग ३० श.प्र.मि. उत्तीर्ण
५. अधिवास प्रमाणपत्र
६. संगणक अर्हता
७. लहान कुटुंब असल्याचे सोबतच्या नमुना- 'अ' मधील विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र
८. विवाहीत महिला उमेदवारांचे विवाह नोंदणी प्रमाणपत्र अथवा विवाहानंतर नावामध्ये झालेल्या बदलाबाबतचे प्रतिज्ञापत्र.

**उमेदवारासाठी सर्वसाधारणा सूचना**

१. उमेदवाराने आपले अर्ज **मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती, मुंबई शहर, ओल्ड कस्टम हाउस, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ००१** या पत्त्यावर दिनांक १६/१२/२०१३ पूर्वी नोंदणीकृत टपालाव्दारे(By Registered A.D.) विहीत नमुन्यात संपूर्ण तपशिलासह पाठवावेत. सोबतच्या नमुन्यातील अर्ज ए-४ साईजच्या पांढऱ्या कोऱ्या कागदावर टंकलिखित/हस्तलिखित सादर करता येतील. मात्र खाडाखोडीच्या ठिकाणी स्वाक्षरी करणे आवश्यक राहील. अर्जाच्या पाकिटावर ठळक अक्षरात उल्लेख करावा.
२. उमेदवारांनी स्वत:चे नाव व संपूर्ण पत्ता लिहिलेल्या २४ x १२ सें.मी. आकाराच्या पाकिटावर पाच रुपयांचे पोस्टाचे तिकिट लावून, २ लिफाफे व १ फोटो अर्जासोबत जोडावेत.
३. उमेदवाराने ओळखपत्रावरील छायाचित्राच्याआकाराचे त्यांचे अलिकडचे छायाचित्र , आवेदन पत्रावर विहित जागी घट्ट चिकटवावे व त्यावर उमेदवाराने स्वत:ची स्वाक्षरी करावी.
४. विहित पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवाराचे अर्ज, अपूर्ण किंवा चुकीचे भरलेले अर्ज, वय, शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी संदर्भातील आवश्यक त्या प्रमाणपत्रांसह साक्षांकित प्रती नसलेले अर्ज, अशा कारणांनी अपात्र ठरलेल्या अर्जाच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
५. अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकावर (कार्यालयीन वेळेनंतर) प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.
६. सदर जाहीरात या कार्यालयाच्या वेबसाईटवर (www.mumbaicity.gov.in) प्रसिध्द करण्यात आली आहे.

७. सदर पदासाठी नियमानुसार उमेदवाराची लेखी/टंकलेखन/लघुलेखनाची परिक्षा घेण्यात येईल. परिक्षेचे स्थळ व वेळ तसेच परिक्षेसाठी पात्र उमेदवारांची यादी या कार्यालयाच्या www.mumbaicity.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. परिक्षेकरिता पात्र झालेल्या उमेदवारांना त्यांची प्रवेशपत्रे पोस्टाद्वारे पाठविण्यात येतील.

८. उमेदवाराने परीक्षेसाठी स्वखर्चाने येण्याचे आहे.

९. अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे मुलाखतीस बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

१०. भरतीप्रक्रियेसंदर्भात न्यायालयीन दाव्याचे कार्यक्षेत्र मुंबई शहर राहिल.

११. विवाहीत महिलांनी पूर्वाश्रमीच्या नावे (By Birth) अर्ज करणे आवश्यक आहे.

१२. प्रस्तावित पदावरील नियुक्तीकरीता कोणत्याही तऱ्हेचा दबाव आणल्यास, उमेदवार नियुक्तीस अपात्र ठरेल.

क्रमांक : आस्था/टे-२/सीआर-२/लघुटंकलेखक/२०१३
जिल्हाधिकारी मुंबई शहर यांचे कार्यालय,
मुंबई, दिनांक : २८/११/२०१३

सही/-
(चं.व.ओक)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा निवड समिती, मुंबई शहर

## अर्जाचा नमुना

अर्जाचा कार्यालयीन क्रमांक ------

| पासपोर्ट साईज फोटो येथे चिकटवावा |
|---|

प्रति,
मा. जिल्हाधिकारी तथा,
अध्यक्ष,
जिल्हा निवड समिती, मुंबई शहर
पोस्ट बॉक्स नं.१, ओल्ड कस्टम हाउस,
शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ००१

### लघुटंकलेखक या पदासाठी अर्ज

जाहिरातीचा क्रमांक व दिनांक

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ***१) संपूर्ण नाव** | | आडनाव | स्वत:चे नाव | वडीलांचे/पतीचे नाव |
| दोन्ही भाषेत | मराठी | | | |
| | इंग्रजीत | | | |
| ***२) पत्रव्यवहाराचा पत्ता (पिनकोडसह)** | | | | |
| मराठीत | | | | |
| ***३) दूरध्वनी क्रमांक<br>खालील पैकी लागू असलेल्या ठिकाणी (✓) अशी खुण करावी** | मोबाईल क्रमांक | | | |
| ४) लिंग | (पुरुष) / (स्त्री) | | | |
| *५) (अ) अर्जदाराची जन्मतारीख (आकडयात) | दिनांक | महिना | वर्ष | |
| (ब) दिनांक ०१/१२/२०१३ रोजी पूर्ण वय (अंकात) | वर्ष | महिना | दिवस | |
| ६) वैवाहिक स्थिती | | (विवाहित) / (अविवाहित) | | |
| ***७) शैक्षणिक अर्हता व अनुभव** | | | | |

| **अर्जदाराची शैक्षणिक अर्हता (उत्तीर्ण झालेल्या परिक्षांचा तपशील)** | **शासकिय वाणिज्य संस्थेचे/ विद्यापीठ परीक्षा मंडळाचे नाव** | **उत्तीर्ण झाल्याचे वर्ष** | **मिळालेल्या गुणांची टक्केवारी** |
|---|---|---|---|
| अ) एस.एस.सी | | | |
| ब) मराठी लघुलेखनाचा वेग ८० श.प्र.मि. | | | |
| क) इंग्रजी लघुलेखनाचा वेग ८० श.प्र.मि. | | | |
| ड) मराठी टंकलेखन वेग ३० श.प्र.मि. | | | |
| इ) इंग्रजी टंकलेखन वेग ४० श.प्र.मि. | | | |

| | |
|---|---|
| ***८) अनुभव -** | |
| ***९) (खाजगी/शासकीय कार्यालय)** | |
| **कार्यालय संस्थेचे नाव व पत्ता, पदनाम, नोकरीचा कालावधी** | |
| **टीप: पुर्वानुभव असल्यास संबंधित कार्यालयाकडील/संस्थेकडील दाखला जोडणे आवश्यक राहील.** | |
| ***१०) भाषेचे ज्ञान:- मराठी, हिंदी, इंग्रजी** | |
| ***११) संगणक अर्हता :-** | |

जाहीरातीत नमुद केलेल्या अटी व शर्ती मला मान्य असून, या अटी व शर्तीचा भंग केल्यास भरतीच्या कुठल्याही टप्प्यामध्ये माझी उमेदवारी रद्द होईल याची मी समज घेतली आहे. अर्जात नमूद केलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे खरी व बरोबर आहे. या पदासाठी विहीत केलेली शैक्षणिक अर्हता आणि / अनुभव माझ्यापाशी आहे. मी आणखी असे प्रमाणित करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी व चुकीची आढळून आल्यास, खोटया माहितीच्या आधारे मिळालेली उमेदवारी किंवा निवड/नियुक्ती रद्द होण्यास मी पात्र ठरेन. त्याबद्दल माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

**दिनांक:**

**स्थळ:**

अर्जदाराचे नाव व सही

टीप:- १) '*' या चिन्हाने दर्शविलेली माहिती परिपूर्ण भरणे बंधनकारक आहे. न भरल्यास अर्ज अपात्र ठरेल.
२) जाहिरातीतील मसुद्यातील अनु. क्र ७ मध्ये नमुद केलेल्या क्र. १ ते ८कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती अर्जासोबत जोडल्या नसल्यास अर्ज अपात्र ठरेल.

**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील प्रतिज्ञापनाचा नमुना - अ**

**प्रतिज्ञापत्र**

**नमुना - अ**

**(नियम ४ पहा)**

मी श्री./श्रीमती/कुमारी ____________________________________________

श्री. ______________________ यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी, वय _______वर्षे राहणार________________

याव्दारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो/करते की, (१) मी ____________ या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.

(२) आज रोजी मला_______(संख्या) इतकी मुले आहेत, त्यापैकी दिनांक २८मार्च, २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या______ आहे. (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा)

(३) यात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईन याची मला जाणीव आहे.

ठिकाण:

दिनांक:

अर्जदाराची सही

---

टिप :- अविवाहित उमेदवारांनी नमुना-अ प्रतिज्ञापत्र लागू नाही असे नमुद करणे आवश्यक आहे. प्रतिज्ञापत्रावर स्वाक्षरी नसल्यास अर्ज अपूर्ण आहे असे समजून अर्ज रद्द करण्यात येईल.

**परिशिष्ट - अ**

**(जोडलेली प्रमाणपत्रे/दाखले)**

खालील कागदपत्रांच्या सांक्षाकित छायाप्रती जोडले असल्यास (✓ ) अशी खूण करावी.

१) शाळा सोडल्याचा दाखला/जन्मदाखला ( )

२) संगणक परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र ( )

३) अधिवास प्रमाणपत्र ( )

४) लहान कुटुंब असल्याबाबतचे प्रतिज्ञापन (नमुना-अ) (मूळ प्रतीत) ( )

५) विवाहित महिला उमेदवारांचे विवाह नोंदणी प्रमाणपत्र अथवा विवाहानंतर नावामध्ये झालेल्या बदलाबाबतचे प्रतिज्ञापत्र ( )

६) अर्ज करणारा उमेदवार शासकीय/निमशासकीय सेवेत कार्यरत असेल तर अशा उमेदवाराने संबंधित कार्यालयाच्या नियुक्ती प्राधिकाऱ्यांची पूर्वपरवानगीची पत्र ( )

**टीप:- अन्य अर्हतेविषयक प्रमाणपत्रे असल्यास त्यांचा उल्लेख करुन अनुक्रमांक नमूद करावा.**